दिव्य मराठी
जळगाव
divyamarathi.com
रविवार, ८ डिसेंबर २०२४

साहित्य • म्हसदी येथील देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात कार्यक्रम

# सामाजिक, राष्ट्रहितासाठी साहित्य निर्मिती होणे आवश्यक : डॉ. पाठक

प्रतिनिधी | म्हसदी

साहित्यिक हा समाजाचा एक महत्वाचा घटक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न साहित्यिकांनी कथा, कविता, कादंबरीतून मांडावे. जमिनीशी नाळ जोडणे म्हणजे कृतज्ञता होय. सामाजिक व राष्ट्रहित घडवण्याच्या दृष्टीने साहित्यिकांनी साहित्याची निर्मिती करावी, असे मत साहित्य अकादमी नवी दिल्लीचे केंद्रीय कार्यकारिणी मंडळ सदस्य डॉ. नरेंद्र पाठक यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या कै. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील भाषा मंडळ आणि साहित्य अकादमीतर्फे ग्रामलोक या साहित्यिक उपक्रमाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक कुणाल संजयकुमार देवरे होते. या वेळी शशिकांत घासकडबी, माजी प्राचार्य डॉ. एस.आर.पाटील, नरेंद्र बापूजी खैरनार, डॉ. सविता पटेल आदी उपस्थित होते. डॉ. नरेंद्र पाठक म्हणाले की, साहित्य अकादमी फक्त पुरस्कारापुरता मर्यादित नसून, साहित्याचे वाचन, लेखन व एकूणच साहित्य चळवळ गावपाड्यापर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी काम करते आहे. साहित्य अकादमीचा हा उद्देश असल्यामुळेच ग्रामलोक हा कार्यक्रम देऊर खुर्द या गावात घेण्यात आला. साहित्यप्रेमींना एकत्र आणणे हे अकादमीचे कार्य आहे. साहित्य, संस्कृती आणि भाषा हे राजकारणाचे विषय नाही. साहित्यिकांनी अभिव्यक्त झाले पाहिजे, असेही ते म्हणाले. कुणाल देवरे म्हणाले की, साहित्य हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातून निर्मित होत असते. व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया अंतर्मनातून होते. साहित्यिकाचा अंतरात्मा शुद्ध असेल तर उत्तम समाज निर्मितीचे कार्य साहित्यातून होऊ शकते, असेही ते म्हणाले. या वेळी उपस्थित कवींनी मराठी कवितांचे वाचन केले. प्रा. जगदीश वाघ यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी आभार मानले.

## खान्देशची लोकधारा कार्यक्रमाने आणली रंगत

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात देऊर जि. प. मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी खान्देशची लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमातून खान्देशातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडवण्यात आले. तिसऱ्या सत्रात निमंत्रित कवींचे बहुभाषिक काव्य संमेलन संपन्न झाले. संमेलनाचे उद्घाटन नंदुरबार येथील शशिकांत घासकडबी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते. विविध विषयांवर स्वरचित कविता सादर करण्यात आल्या. निमंत्रित कवींना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. बहुभाषिक काव्य संमेलनात धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील २० कवींनी मराठी, हिंदी, इंग्रजी व अहिराणी कविता सादर केल्या.

## साहित्याला जात नसते

डॉ. एस. आर. पाटील म्हणाले की, साहित्याला जात, कुळ नसते. रामायण, महाभारत, संत साहित्य व इतर महत्त्वाच्या साहित्याचे वर्गीकरण ग्रामीण, नागरी, दलित, स्त्रीवादी साहित्य प्रवाहांमध्ये करणे अपरिपक्वतेचे लक्षण आहे. साहित्य हे साहित्यच असते. त्याचे वर्गीकरण करू नये. सर्जनशील लेखक निरपेक्षपणे लेखनाची साधना करतो, असेही ते म्हणाले.